| | |
|---|---|
| MHOS080000682016 | नियमित दि.दा.क्रं. १७/२०१६<br>सुलाबाई ठाकुर ..वि.. व्यंकट व इतर |

## निशाणी क्रमांक ४५ वर आदेश पारीत

सदरचा अर्ज हा दाव्यातील वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द वाटणी होऊन पृथक ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्याच्या परिच्छेद क्रमांक १ मध्ये दावा मिळकत व जमीन गट नंबर ७२ क्षेत्र ०० हे. ६८ आर ही मयत व्यंकट सदाशिव चव्हाण यांच्या वारसांच्या नावे असुन त्या जमीनीशी वादी व प्रतिवादीचा कसलाही हक्कसंबंध नाही. दावा करीत असताना नजरचुकीने गट क्रमांक ७२ दाव्यात समाविष्ट करण्यात आलेली असल्यामुळे ती दाव्यातुन वगळण्यात यावी व त्याअनुषंगाने दाव्यात योग्य ती दुरुस्ती होऊ मिळणेबाबत मागणी करुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्रंमांक १, ३ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे अर्जाच्या पाठीमागे दिलेले असुन त्यांचे असे कथन आहे की, गट क्रमांक ७२ मधील जमीनीशी वादी व त्यांचा काहीही संबंध नाही. सदरची बाब त्यांनी त्यांच्या कैफियतमध्ये नमुद केलेली असल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार असल्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रतिदाव्यातील वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा हा वादीने वाटणी होवुन पृथक ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्टयर्थ अभिलेखावर

७/१२ उतारा व फेरफार उतारा दाखल केलेले आहेत. सदर दस्ताऐवजांची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, गट क्रमांक ७२ ची मिळकत ही मयत व्यंकट सदाशिव चव्हाण यांचे नावे असुन सदर मयत व्यंकट सदाशिव चव्हाण व त्यांचे वारस हे दाव्याचे पक्षकार नाहीत. सदरची मिळकत ही नजरचुकीने दाव्यात समाविष्ट करण्यात आलेली असल्यामुळे ती वगळणे न्यायोचित आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटणी व पृथक ताबा मिळणेसाठी असल्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत असे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदरचे प्रकरण हे स्थावर मिळकतीसंदर्भात असल्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वासाठी सदर दावाच्या अंतीम निकाल योग्यतेवरती लागणेकरीता सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. प्रस्तुत दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांच्यामधील मुळवाद योग्यतेवरती निकाली काढण्यासाठी मदत होईल. सदरचा अर्ज देण्यास दाव्यातील वादीस विलंब झाल्याकारणाने अर्ज खर्चावर मंजुर करणे न्याय व योग्य आहे. करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज हा रक्कम रुपये १०००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. सदरचा खर्च दाव्यातील वादीने प्रतिवादी क्रं. १, ३ ते ५ यांना संयुक्तीक दयावा.

३. वादीस दाव्यामध्ये प्रस्तुत अर्जात मागणी केल्याप्रमाणे विहीत कालावधीत दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

४. वादीने दावा दुरुस्त केल्यानंतर दुरुस्त दाव्याच्या प्रती दाखल करावे.

Shyam Shrinivas Kalaskar
Digitally signed by Shyam Shrinivas Kalaskar
Date: 2024.07.15 17:17:36 +0530

दिनांक १५/०७/२०२४

(एस.एस. कळसकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, लोहारा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : R.M. Kokare |
| Court Name | : Shri. S.S. Kalaskar, CJJD Lohara. |
| Date | : 15.07.2024 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 15.07.2024 |
| Judgment uploaded on | : 15.07.2024 |